प्रेस नोट दिनांक १८/०१/२०२४

| | |
|---|---|
| असीबी | रत्नागिरी युनिट |
| आरोपी इतर लोकसेवक | १) श्री.राजन प्रभाकर साळवी, आमदार २६७ राजापूर विधानसभा मतदारसंघ जि.रत्नागिरी (इतर लोकसेवक)<br>२) सौ. अनुजा राजन साळवी (पत्नी)<br>३) श्री. शुभम राजन साळवी (मुलगा)<br>सर्व रा. साहेब बंगला, एम.एस.ई.बी.ऑफिसचे बाजूला, खालची आळी, रत्नागिरी, ता. जि.रत्नागिरी |
| घटनेचे ठिकाण | ऑक्टोबर २००९ ते ०२/१२/२०२२ या कालावधीमध्ये रत्नागिरी शहर हद्दीत व रत्नागिरी जिल्हयामध्ये वेगवेगळया ठिकाणी |
| अपसंपदा रक्कम | ज्ञात उत्पन्नापेक्षा जास्त एकुण रू. ३,५३,८९,७५२/- इतकी अपसंपदा म्हणजेच ११८.९६ % अपसंपदा संपदित केली |
| थोडक्यात हकिगत | श्री. राजन प्रभाकर साळवी, आमदार २६७ राजापूर विधानसभा मतदारसंघ जि.रत्नागिरी तसेच त्यांची पत्नी सौ. अनुजा राजन साळवी, मुलगा शुभम राजन साळवी सर्व रा. साहेब बंगला, एम.एस.ई.बी.ऑफिसचे बाजूला, खालची आळी, रत्नागिरी, ता.जि. रत्नागिरी यांचेकडे रत्नागिरी शहर हद्दीत व रत्नागिरी जिल्हयामध्ये वेगवेगळया ठिकाणी ऑक्टोबर २००९ ते ०२/१२/२०२२ या कालावधीमध्ये असलेले ज्ञात उत्पन्न, खर्च व मालमत्ता विचारात घेण्यात येवून, त्यांच्या ताब्यात ज्ञात उत्पन्नापेक्षा जास्त एकुण ३,५३,८९,७५२/- रुपये इतकी अपसंपदा म्हणजेच ११८.९६ % अपसंपदा संपदित केली असल्याचे स्पष्ट झाले आहे व त्याबाबतचा समाधानकारक खुलासा त्यांनी सादर केला नाही. म्हणुन गैरअर्जदार श्री.राजन प्रभाकर साळवी, आमदार २६७ राजापूर विधानसभा मतदारसंघ जि. रत्नागिरी यांनी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८(संशोधन २०१८) चे कलम १३(१)(ब) सह १३(२) प्रमाणे तसेच गैरअर्जदार श्री. राजन प्रभाकर साळवी यांची पत्नी सौ. अनुजा राजन साळवी, मुलगा शुभम राजन साळवी यांनी नमूद मालमत्ता ही अपसंपदा आहे हे माहित असूनही त्यांनी जाणीवपूर्वक त्यांचे स्वत:चे नावे मालमत्ता धारण करून कब्जात बाळगणे कामी श्री. राजन प्रभाकर साळवी आमदार, यांना गुन्हा करण्यास प्रोत्साहन दिले म्हणुन रत्नागिरी शहर पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर. २४/२०२४ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८(संशोधन २०१८) चे कलम १२ प्रमाणे आज दिनांक १८/०१/२०२४ रोजी ०९.०८ वाजता गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास श्री. सुशांत चव्हाण पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. रत्नागिरी हे करीत आहेत.<br>त्या अनुषंगाने आमदार श्री. राजन साळवी यांचे घर, हॉटेल, कार्यालय व इतर सात संबंधित ठिकाणी एकाच वेळी लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत घरझडती सुरु करण्यात आली आहे. |

**सदरची कारवाई मा. श्री. सुनिल लोखंडे, पोलीस अधीक्षक सो, लाप्रवि ठाणे परिक्षेत्र ठाणे, मा. श्री. अनिल घेरडीकर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि ठाणे परिक्षेत्र ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुशांत बं. चव्हाण, पोलीस उपअधीक्षक, लाप्रवि रत्नागिरी व पथकामार्फत करण्यात येत आहे.**

**अँन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की,कोणताही शासकिय अधिकारी/कर्मचारी किंवा त्याचे वतीने खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया अँन्टी करप्शन ब्युरो,रत्नागिरी कार्यालयाशी खालील क्रमांकावर संपर्क साधावा.**

**Toll Free No** :- 1064
**Telephone No** :- 02352/222893
**Office email** :- dyspacbratnagiri@mahapolice.gov.in
**Website** :-www.acbmaharastra.gov.in
**Mobile App** :-www.acbmaharastra.net
**Facebook Page** :-www.facebook.com/MaharastraACB

**(सुशांत बं. चव्हाण)**
**पोलीस उप अधीक्षक**
**लाचलुचपत. प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी.**



Scanned with CamScanner